# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

**डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)**


दि.२७/०३/२०१८

**प्रेसनोट**

## जुगार खेळणाऱ्यावर गुन्हे शाखेची धाड.

दि२७/१२/२०१८- आज रोजी गुन्हे शाखेने गोपनीय माहितीच्या आधारे जाधवमंडी चौराहा येथील रोडवरील पश्चिममुखी श्रीकृष्ण झेरॉक्स सेंटर दुकानात छापा मारून ०२ इसमांना FUN TARGET अँपवर जुगार खेळताना पकडले.

गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.शिवाजी कांबळे यांनी अधिक माहिती दिली कि, गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाराने माहिती दिली कि, काही इसम कॉम्प्युटर मध्ये FUN TARGET नावाचा अँप डाऊनलोड करून पैशावर FUN TARGET नावाचा जुगाराचा खेळ खेळत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून आज रोजी जाधवमंडी चौराहा येथील रोडवरील पश्चिममुखी श्रीकृष्ण झेरॉक्स सेंटर दुकानात औरंगाबाद येथील एका शटर दुकानावर छापा मारला असता सदर ठिकाणी इसम नामे १) हौसेन खान युसुफ खान रा.संजय नगर ग.न.०३ औरंगाबाद २) शेख सलमान शेख नसीर वय २२ वर्ष रा.संजय नगर पाण्याच्या टाकीजवळ, सुभान यांचे घरात, औरंगाबाद हे कॉम्प्युटरवर FUN TARGET नावाचा गेम पैसे लावून नशिबावर जुगार खेळतांना व खेळविताना मिळून आल्याने त्यांना जागीच पकडण्यात आले. त्यांचे ताब्यातून एकूण ८,३४०/- ज्यात रोख रक्कम व कॉम्प्युटर, जीवो किंपनीचा डोंगल मिळून आला. यावरून पोलीस स्टेशन सिटीचौक येथे महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

हि कामगिरी पोलीस निरीक्षक शिवाजी कांबळे, पोलीस उप निरीक्षक एन.पी.भंडारे, सफौ/साईनाथ महाडिक, पोह/एस.एम.धुमाळ, फारुख देशमुख, पोना/ अफसर शहा, संजय नंद, पोकॉ/ एस.टी.जाधव, व्ही.पी.माताडे, एस.इ.भोसले, ओ.यु.बनकर यांनी केली.

SD/-

पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर

करिता